**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७८/२०१३</u>**
**<u>वादीतर्फे सा.क्र.२</u>**
**<u>निशाणी क्र.७४ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. गोळे यांच्यामार्फत पुढील सरतपासः–</u>**

७. नि.क्र.७४ वर माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांच्यामार्फत उलटतपासः–</u>**

८. माझी जन्मतारीख २१.०६.१९८४ आहे. सन १९८६ व १९८८ रोजी झालेल्या खरेदीखताबाबत मी त्यावेळी लहान असल्यामुळे मला ते माहित नव्हते. दि.११.०८.१९८८ व २३.०४.१९८६ रोजीच्या खरेदीखताबाबत माहिती झाल्यानंतर मी त्या बाबत कोणतीही तक्रार अथवा केस दाखल केलेली नाही. पुरावा देण्याच्या अगोदर सदर केस कशाबाबत आहे, याबाबत मी विचारणा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांकडून सदर दाव्याबाबत माहिती घेवून सदर दाव्यामध्ये पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.११.०८.१९८८ व २३.०४.१९८६ रोजीच्या खरेदीखताच्या प्रती माझ्या वडीलांनी मला दिल्या. त्या मी वाचलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतातील जो मजकूर वाचलेला आहे, त्या मजकूरानुसार मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र तयार केले आहे. सदर खरेदीखतानुसार महसुल दप्तरी नोंदी झाल्या होत्या अथवा नाही, याबाबतची मी माझ्या वडीलांकडे चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी सदर खरेदीखतानुसार महसुल दप्तरी नोंदी झाले असल्याबाबत मला सांगितले. तो मजकूर माझ्या पुराव्याचा प्रतिज्ञापत्रात मी नमुद केलेला नाही. सदर फेरफार नोंदी मी स्वतः पाहिलेल्या व वाचलेल्या आहेत.

९. दि.२६.०४.२०१० रोजी प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्या नावे करुन दिलेले खरेदीखत मी वाचले आहे. प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाची नोंद महसुल दप्तरी

सदर खरेदीखताद्वारे घेण्यात आलेली आहे, हे मी वाचले आहे. सदरचे खरेदीखत हे २ हे. २ आर इतक्या जमीनीचे आहे. सदर खरेदीखतामध्ये नाममात्र असा उल्लेख आहे अथवा नाही, हे मला आता सांगता येणार नाही. मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि.१७.१२.२०२५ रोजी दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीखतामध्ये नाममात्र मजकूर हे आहे अथवा नाही, हे माहित नसताना देखील मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये "नाममात्र' मजकूर नमुद केलेला आहे. मला स्मृतीभ्रंशाचा आजार नाही. मला १ महिना पुर्वी घडलेली प्रत्येक गोष्ट आठवते. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यावेळी माझे वडील सेवानिवृत्त झाले नव्हते, परंतु ते सन २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात माझे वडील हे नोकरीला होते, त्या उद्देशाने ते पारस येथे राहत होते, माझे वडील आज सेवानिवृत्त झालेले आहे, हा मजकूर नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर मी चुकीचा नमुद केलेला आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद केलेल्या तुमचे आजोबा मोतीराम गणपत लांडे यांनी मौजे पारस येथील सर्व्हे क्र.३४९/१ क्षेत्र १३ एकर ११ गुंठे या शेतीची तुमचे वडील व प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या सह चंपाबाई गणपत लांडे यांच्यासोबत तात्पुर्ती व्यवस्था केली होती, हे दाखविण्यासाठी तुमच्याकडे कोणताही कागदोपत्री दस्त नाही ? |
| **उत्तरः** | मी फेरफार पाहिले होते. |

१०. सदरचे फेरफार माझ्या वडीलांनी सदर दाव्याकामी दाखल केले आहेत, याबाबत मला माहित आहे. सदर फेरफार मध्ये नमुद केलेला मजकूर मला माहित आहे. सदर फेरफार मी सन १९६८ चे पाहिलेले आहेत. माझ्या वडीलांनी सदर दावा दाखल करण्यापुर्वी सदर दाव्यातील प्रतिवादी यांना सदर जमीन ही वडीलोपार्जीत आहे व त्यामध्ये माझा हिस्सा आहे तसेच त्यांनी केलेले खरेदीखत हे माझ्या बंधनकारक नाही, याबाबत मला आकलन आल्यानंतर मी नोटीस पाठविली नाही. सदर दाव्यामध्ये पुरावा देण्यापुर्वी माझ्या आजोबांनी कोणकाणती मिळकत ही बक्षीसपत्राद्वारे माझ्या वडीलांना दिली याबाबत मी माझ्या वडीलांकडे विचारणा केली होती. त्याबाबत माझ्या वडीलांनी मला माहिती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा मी माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद शेतीमध्ये

माझ्या वडीलांचा कोणताही हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांचे शेत हडप करण्याच्या उद्देशाने मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २७.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.28 11:12:07 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २७/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २८/०१/२०२६ |